# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ६५५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:—०८/१०/२०१६

**१) कृषी केन्द्र दुकानातुन सामानाची चोरी . :—**

दिनांक ०६/१०/२०१६ ते ०७/१०/२०१६ चे रात्र दर. यातील फिर्यादी रितेश यशवंतराव धाबेकर वय ३२ वर्ष रा. पालोरा यांची पवनी येथील अध्येयक कृषी केंन्द्र दुकानाच्या दारची साखळी काढुन, तोडुन कोणीतरी अज्ञात चोराने दुकानात प्रवेश करुन दुकानातील सिसीटीव्ही कॅमेराचे डीव्हीआर, टिव्ही, टोनर व नगदी १२,०००/—रु. असा एकुण ३०,२००/—रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ४५७,३८० भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि.गदादे पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**२) घरातील सोन्याचे साहीत्य व नगदी पैश्याची चोरी . :—**

दिनांक ०४+०५/१०/२०१६ चे रात्र. दर. यातील फिर्यादी सौ. दिपाली शैलेश धांडे वय २२ वर्ष, रा. काटेबामनी ही राहत असलेल्या घराच्या समोरील दाराचा कोंडा काढुन कोणीतरी अज्ञात चोराने आत प्रवेश करुन घरातील लोखंडी संदुक मध्ये ठेवलेली एक सोन्याची अंगठी वनज ०२.५ ग्रॅम, ०१ सोन्याची नथ वनज २.५ ग्रॅम, व नगदी ७७०/—रु. असा एकुण १४,७७०/—रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन करडी येथे कलम ४५७,३८० भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. कठरे पो. स्टे. करडी हे करीत आहेत.

**३) घरातील सोन्या— चांदीचे, पर्सची चोरी . :—**

दिनांक ०६/१०/२०१६ रोजी १८.३० ते २०.०० वा. दर. यातील फिर्यादी सौ. सुशीला परसराम तिबुडे वय ५७ वर्ष, रा. खात रोड भंडारा हिच्या मुलीची प्रकृती बरी नसल्याने व पती हजर असल्याने जवळ असलेल्या सोन्या चांदीचे दागीन्याची पर्स हॉलमधील सोफ्यावर ठेवुन दवाखान्यामध्ये गेली असता कोणीतरी अज्ञात चोरानी खुल्या दरवाज्यातुन आत प्रवेश करुन सोफ्यावरील पर्स व त्यात असलेला एक सोन्याचा पिटीव मन्याचा मंगळसुत्र ३.५ तोडा, १ सोन्याचा गोप लॉकेटसह वनज १ तोळा, १ सोन्याचा नेकलेस वनज १ तोडा, एक सोन्याचे कानातील टॉप्स, बि—या ६ नग वनज ७ ग्रॅम, सोन्याची नथ वनज २ ग्रॅम, चांदीचे पायातील चाळ वनज ४ तोडे असा एकुण १,४८,०००/—रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३८० भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनि. रायपुरे पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**४) घरात मृत अवस्थेत इसम आढळुन आल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०७/१०/२०१६ रोजी १७.०० वा. दर. यातील मृतक श्री. संतकुमार बसुरीलाल तिवारी वय अंदाजे ५० वर्ष, रा. सिडीकेंट बॅक डोंगरी बुज हा आपल्या घरी नग्न अवस्थेत मृत प्रेत जमीनीवर पडुन दिसले व त्यांचे डोक्याला गंभिर दुखापत होवुन त्यातुन मोठया प्रमाणात रक्तस्त्राव होवुन जमीनीवर रक्ताचा थारोळा दिसुन आल्याने फिर्यादी आषीश टेपचंद सुर्यवंशी वय ३३ वर्ष, रा. डोगरी/माईन्स यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ३०२ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनि. झोटींग पो. स्टे. गोबरवाही हे करीत आहेत.

**५) विवाहीतेचा शारीरीक व मानसीक छळ केल्याने गुन्हा नोंद. . :—**

दिनांक १४/०८/२०१६ रोजी १२.०० वा. पुर्वी पासुन यातील फिर्यादीचे आरोपी क्र. १ सोबत दिनांक २३/०४/२०१४ ला जातीरीवाजा प्रमाणे लग्न झाले. असुन फिर्यादीचे आरोपी क्र. २ सासु व आरोपी क्र. ३ हा नंदई आहे. यातील आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीचे चारीत्र यावर संशय घेवुन तिला शारीरीक व मानसीक त्रास देवुन मारपीट केल्याने फिर्यादीचे व डॉक्टर रिपोर्ट वरुन व कौटुंबीक महीला आपादग्रस्त कल्याण केन्द्र साकोली यांचे पत्रावरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ४९८(अ),३२३,३४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पो. स्टे. साकोली हे करीत आहेत.

६) अवैध दारु/जुगार अडयांवर धाडी . :—

दिनांक ०७/१०/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. सिहोरा व भंडारा येथील अवैध दारु/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ०२ गुन्हे दाखल करुन आरोपीतांच्या ताब्यातुन २० लिटर हातभट्टी दारु कि. १२,००/—रु. तसेच जुगारातुन कि. २८५/—रू. असा एकुण कि. १,४८५/—रू. चा माल जप्त करण्यात आला.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.